शुक्रवार, ११ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ११४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## शिवरायांची जगदंबा तलवार ब्रिटनमधून परत आणणार



**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराजांची जगदंबा तलवार ही ब्रिटनमधून परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. केंद्र सरकारमार्फत ब्रिटन सरकारकडे यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे सांगत ही तलवार २०२४पर्यंत महाराष्ट्रात परत आणण्यासाठी केंद्र सरकारकडे आम्ही पाठपुरावा करीत आहोत. ऋषी सुनक ब्रिटनचे पंतप्रधान झाल्यानंतर आता केंद्र सरकारच्या माध्यमातून जगदंब तलवार परत आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिवराज्याभिषेकाला २०२४मध्ये ३५० वर्षे पूर्ण होतील. त्यासाठी राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून आम्ही एक आराखडा तयार करीत असून या वेळी जर जगदंबा तलवार भारतात परत आली, तर आमचा आनंद द्विगुणित होईल, असे ते म्हणाले.

**अंतरंग**
घोणसे घाटात ट्रकला अपघात; चौघे जखमी/२
उरणमध्ये नौदलाच्या डोंगराला आग; वृक्षसंपदा खाक/६
अलिबाग-मुरूड रस्त्याचे लवकरच मजबुतीकरण/७

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल स्वच्छतेमध्ये ठरले देशात अव्वल

## १९ नोव्हेंबरला दिल्लीत होणार भारत सरकारच्या वतीने सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने देशातील सर्वात स्वच्छ विद्यालय असण्याचा मान पटकावत देशात अव्वल स्थान मिळविले आहे. भारत सरकारच्या वतीने स्वच्छ विद्यालय राष्ट्रीय पुरस्काराचा बहुमान मिळवणारे रायगड, नवी मुंबईतील हे एकमेव विद्यालय ठरले असून रायगड जिल्ह्याचा गौरव वृद्धिंगत करणारी अभिमानास्पद कामगिरी आहे.



**पनवेल : राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते मुख्याध्यापिका राज अलोनी, हेडबॉय आदेश परेश ठाकूर यांचा सन्मान.**

भारत सरकारच्या वतीने स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२साठी शाळांचे नामांकन मागविण्यात आले होते. त्यामधून जिल्हा व राज्य पातळीवर सर्वेक्षण करून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय पुरस्कारासाठी एकूण ६०६ शाळांची निवड करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रातून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला राष्ट्रीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे आणि हा पुरस्कार १९ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या समारंभात केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

तत्पूर्वी गुरुवारी (दि. १०) राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील **(पान २ वर...)**

या बातमीचा व्हिडिओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

# मिसिंग लिंक प्रकल्प देशाला पथदर्शी ठरेल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास; मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पाहणी



(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात येणारा मुंबई-पुणे द्रुतगती मार्गांतर्गत मिसिंग लिंक प्रकल्प हा देशाला पथदर्शी प्रकल्प होणार असून लाखो प्रवाशांना फायदेशीर ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. डिसेंबर २०२३ हा प्रकल्प पूर्णत्वास येईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते कुसगाव या नवीन मार्गिकेच्या (मिसिंग लिंक) प्रकल्पाला भेट देऊन लोणावळा (सिंहगड संस्था) येथे सुरू असलेल्या बोगद्याच्या कामाची पाहणी गुरुवारी (दि. १०) केली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) महासंचालक राधेश्याम मोपलवार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, एमएसआरडीसीचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर आदी उपस्थित होते.

मिसिंग लिंक प्रकल्पात जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या तळाखाली जवळपास ५०० ते ६०० फूट अंतरावर हा बोगदा आहे. बोगद्याची लांबी आठ किमी असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा बोगदा बांधण्यात येत आहे. बोगद्याची रुंदी २३.७५ मीटर असून देशातील सर्वाधिक रुंदीचा हा बोगदा आहे. **(पान २ वर...)**

## नरीमन पॉइंट ते रायगड प्रवास २० मिनिटांत

**मुंबई** : गोरेगाव येथील एसटेक प्रदर्शनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन गुरुवारी (दि. १०) करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचे काम ८४ टक्के पूर्ण झाले असून नरीमन पॉईंटहून २० मिनिटांत रायगड जिल्ह्यात पोहचू शकणार आहोत, असे सांगितले.

मुंबईला रायगड जिल्ह्याशी थेट जोडणारा हा २२ किमी लांबीचा देशातील सर्वाधिक मोठा पहिला सागरी सेतूमार्ग आहे. या सागरी सेतूवरून दिवसाला किमान एक लाख वाहनांची ये-जा करण्याची क्षमता असून वेळेची तसेच इंधनाची मोठी बचत होईल. या प्रकल्पाचे काम करताना पर्यावरणासह फ्लेमिंगोंचीदेखील काळजी घेण्यात आली आहे.

मुंबई ट्रान्स हार्बर लिंक चिर्ले गावाजवळून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाला जोडण्यात येणार आहे. त्याचबरोबर हा प्रकल्प 'ईस्टर्न फ्री वे'ला जोडणार असल्याने मुंबईतून थेट रायगड असा प्रवास करणे शक्य होणार आहे. शिवाय मुंबई-वरळी कोस्टल रोडदेखील शिवडी-वरळी कनेक्टरमार्गे जोडण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

# रायगड जिल्हा परिषदेची रंगीत तालीम

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची जोरदार तयारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ग्रामपंचयातींच्या निवडणुका जाहीर केल्या आहेत. रायगड जिल्ह्यात २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका म्हणजे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीची रंगीत तालीम ठरणार आहेत.

ग्रामपंचायत निवडणुका झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामपंचयात निवडणुकांच्या निकालावरून जनतेचा कल सजून येणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकांच्या तयारीला लागले आहेत.

जिल्ह्यातील अलिबाग, उरण, कर्जत, खालापूर, पनवेल, पेण, सुधागड,



महाड, माणगाव, श्रीवर्धन, रोहा, मुरूड, तळा, म्हसळा, पोलादपूर तालुक्यांतील निवडणुका होत आहेत.

अलिबाग तालुक्यातील सहा, मुरूड तालुक्यातील पाच, पेण तालुक्यातील २६, पनवेल तालुक्यातील १०, उरण तालुक्यातील १८, **(पान २ वर...)**

## निवडक

### पेणमध्ये भोगावती नदीपात्रात सापडली बॉम्बसदृश्य वस्तू

**पेण** : शहरातील भोगावती नदीपात्रात गुरुवारी (दि. १०) सायंकाळी बॉम्बसदृश्य वस्तू सापडली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत तपास सुरू केला आहे. नदीपात्रात जिलेटिनच्या कांड्या, तसेच इलेक्ट्रिकच्या वायर गुंडाळलेली बॉम्बसदृश्य वस्तू पाण्यात आढळली. त्वरित बॉम्बशोधक व रोधक पथकास बोलावण्यात आले. पोलिसांनी नदीपुलावरील वाहतूक काही काळ रोखली होती.

### संजय राऊतांविरोधातील याचिकेवर आज पुन्हा सुनावणी


**मुंबई** : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांना पीएमएलए कोर्टाकडून मिळालेल्या जामिनाविरोधात ईडीने याचिका दाखल केली आहे. दरम्यान वेळेआभावी या याचिकेवर गुरुवारी (दि. १०) सुनावणी होऊ शकली नाही. या याचिकेवरील आता शुक्रवारी (दि. ११) सुनावणी होणार आहे.

# राज्यातील दिव्यांगांसाठी आता स्वतंत्र मंत्रालय

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यासाठी मान्यता दिली





असून देशपातळीवर हा मोठा निर्णय असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले आहे.

दिव्यांगांसंदर्भात बुधवारी (दि. ९) मंत्रालयामध्ये बैठक झाली. या बैठकीमध्ये राज्यात दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याच्या निर्णयाला मान्यता देण्यात आली आहे. आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

देशात पहिल्यांदाच राज्य सरकारने हा निर्णय घेतल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. या वेळी कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. ज्यांना हात नाहीत, पाय नाहीत, चालता-बोलता येत नाही, दिसत नाही त्यांच्यासाठी हा मोठा निर्णय आहे. दिव्यांगांच्या लढ्यामध्ये हे आमचे मोठे यश आहे, अशा भावना आमदार कडूंनी व्यक्त केल्या.

# 'खारघरमधील बारला भाजपचा ठाम विरोध'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील सेक्टर ३० येथे निरसुख पॅलेस या नव्या बार अँड रेस्टॉरंट या हॉटेलला दारूविक्रीची परवानगी मिळाल्यामुळे लोकांमध्ये जो क्षोभ निर्माण झालेला आहे. या बारला भाजपचा ठाम विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली आहे, असे भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी सांगितले आहे.

नो लीकर झोन म्हणून ओळख असणाऱ्या खारघर शहरात निरसुख पॅलेस नामक एका नव्या बार अँड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने दारूविक्रीची परवानगी दिली आहे, त्याला विरोध दर्शवत ब्रिजेश पटेल यांनी भाजपच्या वतीने ठोस भूमिका मांडली आहे. या नवीन बार विरोधात आंदोलन पुकारल्यास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप नागरिकांसोबत असेल, असेही त्यांनी आश्वसित केले आहे. **(सविस्तर वृत्त पान ३ वर...)**

# कटुता संपविण्यासाठी सर्वांना एकत्र यावे लागेल

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सूचक वक्तव्य

**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची जामिनावर बुधवारी सुटका झाली. सुटका झाल्यानंतर संजय राऊतांनी महाराष्ट्रात निर्माण झालेली कटुता संपवण्यासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाचे मी स्वागत करतो, असे म्हणत कौतुक केले. संजय राऊतांनी कटुतेसंदर्भात केलेल्या वक्तव्यावर या वेळी देवेंद्र फडणवीसांनी सूचक वक्तव्य केले. राजकारणातली कटुता दूर करायची असेल, तर सगळ्यांना



मिळून ठरवावे लागेल, असे फडणवीस या वेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गुरुवारी बोलताना संजय राऊतांच्या जामिनावर भूमिका मांडली. कोर्टाने एक निर्णय दिला आहे. तो निर्णय योग्य की अयोग्य यावर ईडी बोलू शकेल. ते उच्च न्यायालयात गेले आहेत. आता त्यावर काही बोलणे योग्य होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मला जर राऊतांनी भेट मागितली तर मी देईन. राजकारणातली कटुता दूर करायची असेल, तर सगळ्यांना मिळून ठरवावे लागेल. नेत्यांनी शांत राहायचं आणि इतरांना बोलायला लावायचं ही पद्धतही बंद करावी लागेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी म्हणाले.

# एक देश एक निवडणुकीसाठी निवडणूक आयोग सकारात्मक

## निर्णय केंद्राने घ्यावा; मुख्य निवडणूक आयुक्तांचे आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

लोकसभा आणि विधासनभा निवडणुका संपूर्ण देशात एकाचवेळी घेण्याची केंद्रीय निवडणूक आयोगाची तयारी आहे, मात्र हा धोरणात्मक निर्णय असून तो केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. त्यामुळे याबाबतचा निर्णय केंद्र सरकारने घ्यायचा आहे, असे देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पुण्यात सांगितले.

मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार पुणे दौऱ्यावर आहेत. याविषयी आयोजित पत्रकार परिषदेत राजीवकुमार यांनी 'एक देश एक निवडणूक' यावर भाष्य केले. सन २०२४मध्ये होणाऱ्या विधानसभा, लोकसभा



निवडणुका या एकत्रित घेणे निवडणूक आयोगाच्या दृष्टीने शक्य आहे. त्याबाबत साधनसामुग्रीसह आमची सज्जता आहे, मात्र हा धोरणात्मक निर्णय आहे. हा विषय आमच्या अखत्यारीत येत नाही. त्यावर केंद्र सरकारने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

आगामी निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रत्येक घटकाला सामावून घेण्याचा आयोगाचा प्रयत्न आहे. तरुणांपासून तृतीयपंथांनाही यात सामावून घेण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे मतदार यादी, मतदान प्रक्रिया या दोन्ही पारदर्शक आणि सर्वसमावेश करण्याचा मानस आहे. मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केली जाते, मात्र मतदार त्या सुट्टीचा आनंद घेत मतदानाकडे पाठ फिरवितात. त्यामुळे उद्योजक, विद्यापीठे, विविध स्वयंसेवी संस्था, संघटनांशी आम्ही संवाद साधत असून मतदान प्रक्रियेबाबत जनजागृती करीत असल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले.

निवडणूक आयुक्त अनुपचंद्र पांडे, निवडणुक आयोगाचे विशेष अधिकारी डॉ. रणबीर सिंह, निवडणूक उपायुक्त हिरदेश कुमार, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते.

# सचिन वाझेने तुरुंगात सुरक्षारक्षकाला धमकावले

## एनआयएकडून कोर्टात तक्रार दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया बंगल्याबाहेर स्फोटके सापडली होती. या प्रकरणात सचिन वाझे हा मुख्य आरोपी आहे. वाझे सध्या नवी मुंबईतील तळोजा मध्यवर्ती कारागृहात कैद आहे. कारागृहात सुरक्षारक्षकासोबत असभ्य वर्तन केले, तसेच धमकी दिल्याचा आरोप वाझेविरोधात तुरुंग प्रशासनाने केला. यामुळे वाझे न्यायालयाच्या तडाख्यात सापडला आहे.

सचिन वाझेने तुरुंगात सुरक्षारक्षकाला धमकावल्याची तक्रार एनआयएकडून कोर्टात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सचिन वाझेने कोर्टात उत्तर देण्यासाठी वेळ मागितला आहे. डोळे आले असताना मला रुग्णालयात नेले नाही, असा आरोप सचिन वाझे याने केला आणि धमकावले. तुरुंग प्रशासनाच्या तक्रारीमुळे अडचणीत वाढ होऊ शकते, हे वाझेच्या लक्षात आल्यामुळे त्याने माफी मागितली होती. याबाबत गुरुवारी सुनावणी झाली. या वेळी वाझेने कोर्टात उत्तर देण्यासाठी वेळ मागवून घेतला. उलट, तुरुंग प्रशासनावरच रुग्णालयात उपचारासाठी नेले नसल्याचा आरोप केला.

दोन्ही डोळ्यांमध्ये ग्लुकोमा झाला आहे. रुग्णालयात दाखल होण्याची परवानगी देण्याची विनंतीही त्याने न्यायालयात केली होती. तुरुंगात असताना सुरक्षारक्षकाने अडवताच वाझेने धमकी दिली. तुरुंग प्रशासनाने सत्र न्यायालयात तक्रार दाखल केली होती.

**प्रार्थना सभा**



आमच्या मातोश्री
**श्रीमती कांता कृष्णकांत गुप्ते**
यांना दि. १० नोव्हेंबर २०२२ रोजी देवाज्ञा झाली. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११ ते १२ च्या दरम्यान 'प्रार्थना सभेचे' आयोजन केले आहे.
**स्थळ : गणेश मंदिर हॉल, मिडल क्लास हौसिंग सोसायटी मैदान, पनवेल**
आपले विनित
**राजू गुप्ते आणि परिवार**

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्या-मुख्यमंत्री

## शैक्षणिक, उद्योग कर्ज योजनांसाठी केंद्राकडून निधी उपलब्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज तर उद्योग- व्यवसायासाठी मुदत कर्ज आणि सूक्ष्म पतपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून निधी कर्जस्वरुपात उपलब्ध झाला असून या योजनांचा लाभ घेण्यासाठी महामंडळाकडे अर्ज करण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

अल्पसंख्याक विभागाच्या शैक्षणिक कर्ज, मुदत कर्ज आणि सूक्ष्म पतपुरवठा योजनेचा लाभ घेण्यासाठी शुक्रवारी (दि. ११) भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीदिनापासून अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.



मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये हे अर्ज स्वीकारले जाणार असून या कार्यालयांचे पत्ते व संपर्क महामंडळाच्या www.mamfdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या योजनांतर्गत अर्ज करणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक अधिकार दिनी कर्ज वाटप करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. महामंडळामार्फत अल्पसंख्याकासाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

केंद्र शासनाकडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध झाला आहे. या निधीमधून विविध कर्ज योजना राबविण्यात येणार असून या योजनांची राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास आणि वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांनी दोन गटात विभागणी केली आहे.

या सर्व योजनांचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

### शैक्षणिक कर्ज योजना

*शैक्षणिक कर्ज योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या गटात देशांतर्गत शिक्षणासाठी २० लाख रुपये तर विदेशातील शिक्षणासाठी ३० लाख रुपयांची कर्ज मर्यादा निश्चित केली आहे. पहिल्या गटात शहरी भागासाठी १.२० लाख, तर ग्रामीण भागासाठी ९८ हजार आणि दुसऱ्या गटात आठ लाख रुपयांची उत्पन्नमर्यादा ठेवण्यात आली आहे.*

### मुदत कर्ज योजना

*मुदत कर्ज योजनेसाठी पहिल्या गटात २० लाख तर दुसऱ्या गटात ३० लाख रुपयांची कर्जमर्यादा असून उत्पन्नाची मर्यादा शैक्षणिक कर्ज योजनेप्रमाणेच निश्चित केली आहे.*

### सूक्ष्म पतपुरवठा योजना

*सूक्ष्म पतपुरवठा योजनेत पहिल्या गटात प्रत्येक सदस्य एक लाख रुपयांप्रमाणे २० सदस्यांच्या एका गटास २० लाखांपर्यंत तर दुसऱ्या गटात प्रत्येकी सदस्य दीड लाखाप्रमाणे २० सभासदांना ३० लाख रुपयांपर्यंत कर्ज मर्यादा आहे. या योजनेची उत्पन्न मर्यादादेखील शैक्षणिक आणि मुदत कर्ज योजनेसारखीच राहील.*

# घोणसे घाटात तीव्र वळणावर ट्रकला अपघात




**म्हसळा : प्रतिनिधी**

पुणे-दिघी राष्ट्रीय मार्गावरील माणगाव-म्हसळा या रस्त्यावरील घोणसे घाटातील तीव्र उतारावर बोअरवेल नेणाऱ्या ट्रकला मध्यरात्री अपघात झाला. यामध्ये चार मजूर जखमी झाले. हा अपघात बुधवारी (दि. ९) रात्री ११.३० वाजण्याच्या दरम्यान झाला.

माणगाव-म्हसळा या रस्त्यावरील घोणसे घाटात ट्रक (क्र. एमएच १० एस ७८३५)मध्ये बोअरवेल घेऊन जात असताना तीव्र वळणावर चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि ट्रक संरक्षक कठड्याला धडकला. यामध्ये रजपती सिंग वय ३०, देवशरण सिंग वय ३२, सूरजनाथ सिंह वय २१, सुजानसिंह वय ३२ सर्व तात्पुरते रा. माणगाव हे जखमी झाले. जखमींवर म्हसळा ग्रामीण रुग्णालय येथे उपचार करण्यात आले.

अपघाताचा आवाज प्रंचड आल्याने योगेश महागावकर, विजय लाड, अमोल गणवे, उमेश गणवे, निलेश गणवे हे आणि देवघर येथील अनिल महामुनकर, अमोल शिगवण, सुरेंद्र शिर्के, सचिन महामुनकर, अंकुर मोरे यांनी जखमींना मदत केली. म्हसळा पोलीस तत्काळ घटनास्थळी येऊन गुन्हा दाखल केल्याचे समजते.

# रोठ बुद्रुक येथे जलकुंभाचे भूमिपूजन



**धाटाव : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर नल, हर घर जल' या योजनेंतर्गत रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीतर्फे जलकुंभ (पाणीसाठवण टाकी) उभारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन गुरुवारी (दि. १०) रोठ बुद्रुकचे सरपंच नितीन वारंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या जलकुंभाचा फायदा ग्रामस्थांना नक्कीच होईल, असा विश्वास सरपंच नितीन वारंगे यांनी या वेळी व्यक्त केला. भाजप युवामोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, उपसरपंच वेदिका विलास डाके, ग्रामपंचायत सदस्या वैभवी राजेश भगत, सदस्य ज्ञानेश्वर साळुंके, माजी उपसरपंच खेळू वारंगे, रमेश मोरे, माजी सदस्य गुणाजी घाग, राजमुद्रा फाउंडेशन अध्यक्ष राजेश डाके, कार्याध्यक्ष राजेश भगत, भाजप महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, ग्रामसेविका अलका बामुगडे, शालेय समिती अध्यक्ष विलास डाके, तंटामुक्त अध्यक्ष दिलीप वारंगे, तसेच मंगेश देवकर, निरंजन वारंगे, शशिकांत साळुंके, तुकाराम वारंगे यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये जागरूकता व संपर्क अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रविवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता विधी सेवा शिबिर तसेच शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यालयाच्या योजनांची माहिती एकाच छताखाली सर्व लाभार्थ्यांना मिळणार आहे.

# बोरिवलीत रविवारी 'घराणा रंग' संगीत संवादात्मक कार्यक्रम

## पनवेलचे सुपूत्र पंडित उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन

**पनवेल : प्रतिनिधी**

नादब्रह्म परिवार बोरिवलीच्या वतीने रविवारी (दि. १३) 'घराणा रंग' या संगीत संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये पनवेलचे सुपूत्र सुप्रसिद्ध गायक पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाची पर्वणी संगीत रसिकांना मिळणार आहे.



उस्ताद अझीम खान यांच्या संकल्पनेनुसार हा संगीत कार्यक्रम बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे लघुनाट्यगृहात दुपारी ३. ३० वाजता होणार आहे. या संगीत उत्सवात पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष गीत सुरमयी व्यक्तिमत्व संगीत विशारद रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे. या वेळी त्यांना तबल्यावर किशोर पांडे व श्रीनिवास शेंबेकर यांची तर संवादिनीवर भक्ती ब्रहो घैसास यांची साथ लाभणार आहे. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका प्रा. विजया पाटील या करणार आहेत. २० वर्षाच्या संगीत साधनेच्या कालावधीत पंडित उमेश चौधरी यांनी आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभुत्व निर्माण केले आणि या गायन तपस्येतून त्यांनी अनेक पुरस्कार, मानसन्मान, नामांकने मिळवली असून त्यांचा त्यांचे शास्त्रीय गायन रसिकांसाठी सुरमयी पर्वणी असते. त्यामुळे या कार्यक्रमाच्या प्रवेशिका किंवा अधिक माहितीसाठी जाळगावकर (९८२१४५७४७५), कोळी (९८२०४९४४०२) किंवा पाटील (९३२१३२७४०७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नादब्रह्म परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# बालनाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आज पनवेलमध्ये आयोजन

**पनवेल : प्रतिनिधी**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लवकरच बालनाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने तसेच इतर स्पर्धांच्या तयारीच्या दृष्टिकोनातून कलाकारांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षण कार्यशाळेचे शुक्रवारी (दि. ११) पनवेलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

यापूर्वी झालेल्या सहविचार सभेत शिक्षकांनी केलेल्या विनंतीनुसार, शुक्रवारी दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या वेळेत मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात नाट्यलेखन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेमध्ये बालनाट्य हा काय साहित्यप्रकार आहे, त्याचे लेखन आणि उद्दिष्ट, विषयाची निवड आणि कथेचा विस्तार त्याचबरोबर पात्र निर्मिती आणि प्रसंग विस्तार संवाद लेखन नाट्य वाचन आणि फायनल ड्राफ्ट याबाबत चर्चा होऊन मार्गदर्शन होणार आहे. यासाठी सुप्रसिद्ध बालनाट्य लेखक दिग्दर्शक राजू तुलालवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# ग्राईंडवेल नॉर्टनमध्ये जागतिक गुणवत्ता दिन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोरा येथील ग्राईंडवेल नॉर्टन लिमिटेड येथे गुरुवारी (दि. १०) कंपनीचे प्लांट हेड कमलजीत सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक गुणवत्ता दिन साजरा करण्यात आला.

गुणवत्ता दिनाचे महत्त्व कंपनीचे प्लांट हेड कमलजीत सिंह यांनी सांगितले. सिनिअर मॅनेजर परेश मल्होत्रा यांनी औद्योगीक स्पर्धा म्हणजे काय, स्पर्धेमध्ये आजची परिस्थिती काय, याबद्दल सांगितले. या वेळी गुणवत्ता कमिटीची स्थापना करण्यात आली.



या वेळी प्लांट हेड कमलजीत सिंह, ॲडमीन वरिष्ठ मॅनेजर आय. बी. सिंह, सिनिअर मॅनेजर परेश मल्होत्रा, क्वालिटी हेड मॅनेजर सागर पारधी, उत्पादकत्ता प्रमुख मॅनेजर जहीर चौधरी, कामगार वर्ग, कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

पान १ वरून

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने पटकाविले देशात अव्वल स्थान

यांच्या हस्ते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, हेड बॉय मास्टर आदेश परेश ठाकूर आणि शाळेच्या कोऑर्डिनेटर्स यांचा सन्मान करण्यात आला, तसेच जिल्ह्यातील विद्यालयाला हा राष्ट्रीय पुरस्कार मिळत आहे ही रायगड जिल्ह्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे, असेही डॉ. पाटील यांनी नमूद करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या पुरस्काराच्या पार्श्वभूमिवर ९ नोव्हेंबर रोजी भारत सरकार आणि युनीसेफच्या वतीने फोटोग्राफरची टीम रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये पाठवण्यात आली होती. त्यांनी सहा तासांहून अधिक काळ शाळेची शुटींग आणि फोटो काढले, हे सर्व फोटो आणि शुटींची एक डॉक्यूमेंटरी तयार करण्यात येणार असून, ती पुरस्कार प्रदान सोहळ्यावेळी देशभरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दरम्यान या वेळी फोटोग्राफर मयंक सोनी यांनी, देशात एवढी सुंदर आणि सर्वसंपन्न शाळा मी कधीच पाहिली नाही, असे मत व्यक्त केले. अगदी कमी वेळेत शाळेने यशाचे उच्च शिखर गाठले आहे, तसेच देश आणि राज्य पातळीवर अनेक पुरस्कार प्राप्त झाल्याने इतर शाळांसाठी एक आदर्श निर्माण करणारी शाळा म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि मुंबईतून इतर शाळेतील व्यवस्थापक आणि मुख्यध्यापक ही शाळा पाहण्यासाठी येत असतात. यासंदर्भात मुख्याध्यापिका राज अलोनी यांना विचारले असता, त्यांनी शाळेला मिळालेल्या या यशाचे सर्व श्रेय संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जाते कारण त्यांनी वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन आणि प्रोत्साहनामुळेच शाळेने यशाचे शिखर गाठले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, विद्यालयाच्या प्राचार्या, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी मुख्याध्यापक राज अलोनी यांच्यासह पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मिसिंग लिंक प्रकल्प देशाला पथदर्शी ठरेल

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे अंतर अर्ध्या तासाने कमी होणार आहे. बोगद्यामुळे घाटाचा भाग पूर्णतः टाळला जाऊन अपघाताच्या संख्येत मोठी घट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले, या प्रकल्पामुळे प्रवास सुखकर होणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल. त्याशिवाय प्रदुषण कमी होणार असून इंधनाची तसेच वेळेची बचत होईल. अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रवासी, वाहने यांच्या सुरक्षेचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. दरडी कोसळू नये यासाठी सर्वत्र 'रॉक बोल्ट' करण्यात आले आहे. काही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास बाहेर जाण्यासाठी प्रत्येक ३०० मीटरवर एक्झिट मार्ग तयार करण्यात आलेले आहेत. बोगद्याच्या भिंतीला पाच मीटरचे कोटिंग असणार असून त्यावर आगप्रतिबंधक कोटिंग करण्यात येणार आहे. अत्याधुनिक हायप्रेशर वॉटर मिक्स यंत्रणा असून त्यामुळे आग लागल्यास ही यंत्रणा त्वरित कार्यान्वित होऊन आग विझेल, अशीही माहिती त्यांनी दिली.

या वेळी अधीक्षक अभियंता वसईकर यांनी प्रकल्पाच्या सुरू असलेल्या कामाबद्दल मुख्यमंत्री महोदयांना माहिती दिली. कामाची गती राखून नियोजित वेळेआधी प्रकल्प पूर्ण करावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## रायगडात जिल्हा परिषदेची रंगीत तालीम

कर्जत तालुक्यातील सात, खालापूर तालुक्यातील १४, रोहा तालुक्यातील पाच, सुधागड तालुक्यातील १४, माणगाव तालुक्यातील १९, तळा तालुक्यातील एक, महाड तालुक्यातील ७३, पोलादपूर तालुक्यातील १६, म्हसळा तालुक्यातील १३, श्रीवर्धन तालुक्यातील १३ अशा एकूण २४० ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक होणार आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये कमी-अधिक प्रमाण ग्रामपंचायत निवडणुका होत आहेत. यातून जिल्ह्यातील मतदारांचा कल दिसून येईल. त्यानुसार आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणनिती ठरवली जाईल. ही ग्रामपंचायत निवडणूक आगामी जिल्हा परिषद निवडणुकीची रंगीत तालीम ठरणार आहे.

***निवडणूक होणाऱ्या तालुकानिहाय ग्रमापंचाती***

***अलिबाग*** *: आक्षी, नारंगी, बोरीस, मुळे, वैजाळी, शिरवली,* ***मुरूड*** *: काकळघर, कोर्लई, तेलवडे, वावडुंगी, वेळास्ते,* *पेण : आंबिवली, आमटेम, कणे, करोटी, कळवे, काराव, कोप्रोली, कोलेटी, खरोशी, जिते, डोलवी, दादर, दूरशेत, निगडे, पाटणोली, मळेघर, मसद बुद्रुक, मुंढाणी, रोडे, वरप, वरसई, वाशीवली, सापोली, सावरसई, सोनखार, हमरापूर,* ***पनवेल*** *: करंजाडे, कानपोली, केळवणे, चिंध्रण, दिघाटी, नितळस, नेरे, भाताण, शिरढोण, शिवकर,* ***उरण*** *: करळ, कळंबुसरे, घारापुरी, चिर्ले, जसखार, डोंगरी, धुतूम, नवघर, नवीन शेवा, पागोटे, पाणजे, पिरकोन, पुनाडे, बोकडविरा, भेंडखळ, रानसई, वशेणी, सारडे,* ***कर्जत*** *: उक्रुळ, कळंब, कोदिवडे, दहिवलीतर्फे वरेडी, मांडवणे, वावळोली, वेणगांव,* ***खालापूर*** *: आपटी, खरीवली, गोरठण बुद्रुक, चावणी, टेंभरी, देवन्हावे, नडोदे, माडप, वडवळ, वावंढळ, वावोशी, साजगांव, हाळखुर्द, होराळे,* ***रोहा*** *: खैरे खुर्द, तळवेलीतर्फे आष्टमी, दापोली, पहूर, पुई,* ***सुधागड*** *: अडुळसे, आतोणे, आपटवणे, खवली, खांडपोली, घोटवडे, चंदरगाव, चिवे, ताडगाव, तिवरे, माणगाव बुद्रूक, शिळोशी, सिद्धेश्वर बुद्रुक, हातोंड,* ***माणगाव*** *: करंबेळी, कुंभे, कुमशेत, गारेगाव, चिंचवली, टोळखुर्द, डोंगरोली, दहिवली कोंड, नांदवी, न्हावे, पळसप, पहेल, भागाड, मांगरूळ, मुठवलीतर्फे तळे, शिरवलीतर्फे निजामपूर, साई, हरकोल, होडगाव,* ***तळा*** *: रहाटाड,* ***महाड*** *: अप्पर तुडील, आंबवडे, आचळोली, आढी, आदिस्ते, उंदेरी, करंजखोल, करंजाडी, कांबळेतर्फे बिरवाडी, कावळेतर्फे विन्हेरे, किंजळघर, कुंबळे, कुर्ले, कुसगाव, केंबुर्ली, कोझर, कोथेरी, कोल, कोळोसे, खुटील, गोंडाळे, गोठे बुद्रुक, घावरेकोंड, चांभारखिंड, चिंभावे, चिंभावे मोहल्ला, जुई बुद्रुक, तळीये, ताम्हाणे, दादली, दापोली, दासगावा, धामणे, नडगावतर्फे तुडील, नडगावतर्फे बिरवाडी, नांदगाव बुद्रुक, नागाव, नाते, नातोंडी, निगडे, पंदेरी, पाचाड, पारमाची, पाले, पिंपळवाडी, पुनाडे, फाळकेवाडी, बासरगाव, बिजघर, मोहोत, मोहोप्रे, राजिवली, रानवडी खुर्द, रावतळी, रूपवली, लाडवली, लोअरतुडील, वडवली, वरंध, वराठी, वहूर, वाघोली, वामणे, वारंगी, वाळणे खुर्द, वाळसुरे, वीर, शिरगाव, शिरवली, शिरसवणे, सावाणे, साकडी, सावरट,* ***पोलादपूर*** *: आंबेळी, उमरठ, कापडे खुर्द, कालवली, कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, गोळेगणी, चांभारगणी बुद्रूक, दिवील, धामणदिवी, परसूले, पाले, पैठण, बोरघर, भोगाव खुर्द, लोहारे* ***म्हसळा*** *: कणघर, कांदळवाडा, काळसुरी, खरसई, घोणसे, तोंडसूरे, तोराडी, देवघर, निगडी, फळसप, रेवळी, लेप, संदेरी* ***श्रीवर्धन*** *: कुडकी, गुळधे, चिखलप, जसवली, दिवेआगर, मेघरे, रानवली, वाजळे, वाळवटी, शेखाडी, सर्वे साखरोणे, सायगाव.*


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा रामप्रहर

**दुखवटा**

## प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक राजूशेठ गुप्ते यांना मातृशोक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक राजूशेठ (किशोर) गुप्ते यांच्या मातोश्री कांताताई कृष्णकांत गुप्ते यांचे गुरुवारी (दि. १०) वृद्धापकाळाने वयाच्या ९४व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर अमरधाम येथे सायंकाळी ५.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.



या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, उद्योजक जे. एम. म्हात्रे, विलास कोठारे, ओरिअन मॉलचे मंगेश परूळेकर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, एसीपी सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्यासह मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता.

कांताताई गुप्ते यांचे बालपण अतिशय श्रीमंती व सूखामध्ये गेले, परंतु पतीच्या अकस्मात अपघाती निधनानंतर अतिशय कष्ट व संघर्ष करून त्यांनी चार मुलांची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

कांताताई यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवारी (दि. १३) सकाळी ११ ते १२ दरम्यान प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल मिडल क्लास हौसिंग सोसायटी मैदानाच्या गणेश मंदिर हॉलमध्ये ही सभा होईल, असे राजूशेठ गुप्ते यांनी सांगितले आहे.

## निवडक

### कळंबोली वसाहतीमधून रिक्षेची चोरी

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमधून एक रिक्षा चोरीस गेल्याची घटना घडल्याने रिक्षा मालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.कळंबोली वसाहतीमधील दक्षिण मुखी हनुमान मंदिर येथे सुभाष  मुदोकर यांनी त्यांची ५० हजार रुपये किमतीची रिक्षा (एमएच ४६/बीपी/१६३४) ही कळंबोली वसाहतीमध्ये उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्यांनी ही रिक्षा चोरून नेली. तरी याबाबत कोणाला माहिती किंवा सापडल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२-२७४२३०००) किंवा एचसी शिवानंद पुजारी (८१६९४७४५२६) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरी

**पनवेल :** बंद रूममधून लाखो रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम अशा मिळून जवळपास ३,८९,०००/- किमतींचा ऐवज चोरून नेल्याची घटना पनवेल शहरातील लोखंडी पाडा येथे घडली आहे. गीतांजली रासम (वय ६५, रा. श्री सहयोग को. ऑप सोसायटी रूम नंबर २१०) या बंद रूमच्या दरवाजाचे कुलूप कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तोडून बेडरूममधील कपाटात ठेवलेले लाखो रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम अशा मिळून जवळपास ३,८९,०००/- किमतीचा  ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबातची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघरमधील बारविरोधात भाजप नागरिकांच्या बाजूने -ब्रिजेश पटेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर मधील सेक्टर १० येथे निरसुख पॅलेस या नव्या बार अँड रेस्टॉरंट या हॉटेलला दारूविक्रीची परवानगी मिळाल्यामुळे लोकांमध्ये जो क्षोभ निर्माण झालेला आहे, त्यामध्ये 'भारतीय जनता पक्ष' हा पूर्णपणे नागरिकांच्या बाजूने असून, खारघरमधील बारला भाजपचा ठाम विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेली आहे, असे प्रतिपादन भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केले आहे.



नो लीकर झोन म्हणून ओळख असणाऱ्या खारघर शहरात निरसुख पॅलेस नामक एका नव्या बार अंड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने दारूविक्रीची परवानगी दिली आहे, त्याला विरोध दर्शवत ब्रिजेश पटेल यांनी भाजपच्या वतीने ठोस भूमिका मांडली आहे.

ब्रिजेश पटेल यांनी या संदर्भात बोलताना म्हंटले आहे की, खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला आहे.

शहरामध्ये विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये अस्तित्वात असून खारघर शहराची नोंद नो लिकर झोन अशी अनेक वर्षांपासून आहे. खारघरमध्ये नागरिकांच्या मागणीनुसार गेली अनेक वर्षे दारूबंदी आहे व येथील भाजपचे स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार यांनी सातत्याने जनभावनेचा आदर करत या दारूबंदीचे ठाम समर्थन केल्यानेच या विभागांत अनेक वर्षे दारूबंदी जपली गेली. एवढेच नव्हे तर पनवेल महापालिकेत सत्ताधारी भाजपनेच सभागृहात पनवेल दारूमुक्तीचा प्रस्ताव मंजूर केला, परंतु नंतर प्रशासनाने योग्य पाठपुरावा न केल्याने योग्यप्रकारे त्या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही.

भारतीय जनता पक्षाने नेहमीच जनभावनेच्या आदर केला असून, याही वेळी भाजप पूर्ण ताकदीने लोकांसोबत आहे. त्या अनुषंगाने या नवीन बारविरोधात सामाजिक संघटना, स्थानिक नागरिक यांनी आंदोलन पुकारल्यास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लोकभावनेचा आदर करून भाजप पूर्णपणे नागरिकांसोबत असेल, असे ब्रिजेश पटेल यांनी खारघरच्या नागरिकांना आश्वासित केले आहे.

दरम्यान, हॉटेल निरसूक पेलेसला दिलेला दारूविक्रीचा परवाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी शाश्वत फाउंडेशनच्या अध्यक्ष तथा भाजपच्या खारघर तळोजा मंडल उपाध्यक्ष बीना गोगरी यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन दिले आहे.

## ट्रकच्या चाकाखाली येऊन तरुणाचा अपघाती मृत्यू

### तळोजामधील घटना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील साई वर्ल्ड पॅराडाईजच्या कार्निव्हल कार्यक्रमासाठी कुटुंबासह आलेल्या आणि मोटरसायकलवरून भावासह कल्याण येथे परतणाऱ्या तरुणाचा ट्रकच्या चाकाखाली येऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना तळोजा येथे घडली.

या अपघातानंतर ट्रक चालक पळून गेला आहे. अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव सय्यद आवेस इस्माईल (वय २२) असे असून तो कुटुंबासह कल्याणमध्ये राहण्यास होता. सय्यद आवेस आणि त्याच्या कुटुंबीयांना पॅराडाईज ग्रुपच्या वतीने पनवेल येथे उभारण्यात येत असलेल्या साई वर्ल्ड पॅराडाईजमध्ये नवीन घर घ्यायचे होते. त्यामुळे आवेस आणि त्याचे कुटुंबीय पनवेल येथे पॅराडाईज वर्ल्ड कार्निव्हलसाठी कल्याण येथून दोन मोटरसायकलवरून पनवेल येथे आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर आवेस आणि त्याचा लहान भाऊ मोहम्मद हुजेफा सय्यद मोटारसायकलवरून पनवेल-मुंब्रा हायवेने शिळफाटाच्या दिशेने निघाले होते.

या वेळी पनवेल- मुंब्रा मार्गावरील आर. ए. एफ. सिग्नलजवळ पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या मोटारसायकल धडक दिली. त्यामुळे आवेसचा भाऊ डाव्या बाजुला तर आवेस उजव्या बाजुला रस्त्यावर पडला. याचवेळी सदर ट्रकचे चाक आवेस याच्या डोक्यावरुन गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरुन पलायन केले. त्यामुळे तळोजा पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

## आमदार महेश बालदींच्या माध्यमातून करंजाडेत नि:शुल्क फिरते रुग्णालय



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उरण विधानसभा मतदार संघात नि:शुल्क रुग्णवाहिका/फिरते रुग्णालय सुरू करण्यात आले असुन गुरुवारी (दि. १०) करंजाडे आदिवासी भागात सेवा सुरू करण्यात आली.

या वेळी आदिवासी बंधू भगिनींची आरोग्य तपासणी करून उपचार करण्यात आले. भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस विनोदजी साबळे, भाजपा करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, पंकज शहा, युवा नेते  मंगेश शेलार, शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, माजी सरपंच ठकुबाई वाघे, युवा नेते सागर आंग्रे, अतिष साबळे, सुरज शेलार, सुनील भोईर, सागर कदम व असंख्य कार्यकर्ते या कायक्रमाला उपस्थित होते.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पनवेल वार्ता वेब पेज आणि न्यूज चॅनलच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन गुरुवारी झाले. या दिवाळी अंकात महिलांच्या कर्तृत्वाची माहिती देण्यात आली असून या अंकामुळे ही माहिती समाजापर्यंत पोहचणार असल्याचे मत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले. रुपाली शिंदे संपादित सत्य वार्ता पनवेलचा या दिवाळी अंकाच्या प्रकाशनावेळी महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, कोकण डायरीचे संपादक अकबर सय्यद, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, कामगार नेते शैलेश पाटील, पत्रकार किरण बाथम, रायगड सम्राटचे संपादक शंकर वायदंडे, कोकण लेखणीचे संपादक असीम शेख, विशाल सावंत,  किरण अडागळे, रत्नमाला पाबरेकर, स्नेहा धुमाळ, दीपा कोपर्डे, नूतन धोत्रे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका चिटणीस रोशन पाटील याला वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुस्तक भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, खेरणे ग्रामपंचायतीचे सरपंच शैलेश माळी, पंचायत समितीचे माजी सदस्य भुपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

### पळस्पे फाटा येथे दुचाकीची चोरी

**पनवेल :** जवळील पळस्पे फाटा येथे उभी करून ठेवलेली स्कूटी गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे.

बुद्धाराम चोधरी यांनी त्यांची ४० हजार रुपये किमतीची लाल रंगाची सुझुकी (एमएच १४ जेएस १४४५) ही पळस्पे फाटा उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्यांनी ही स्कूटी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अनधिकृत जाहिरात करणाऱ्यांवर पमपाची कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात जाहिरात करण्यासाठी महापालिकेची पूर्व परवानगी न घेता सार्वजनिक मालमत्तांचा वापर करणाऱ्यांवर 'मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५' अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात  प्रभाग 'ड'चे अधिकारी अमर पाटील यांनी गुन्हा दाखल केला आहे. अनधिकृत जाहिरात करणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्याचा आयुक्त गणेश देशमुख यांनी इशारा दिला आहे.

अनेकदा विविध खासगी संस्था, कंपन्या, विविधक्लासेस आपली जाहिरात करण्यासाठी महापालिकेची पूर्व परवानगी न घेता सार्वजनिक मालमत्तांचा वापर करीत असतात. महापालिका प्रशासनानाची पुर्व परवानगी न घेता अशा प्रकारे जाहिरातीचे फलक, भित्तीपत्रे लावून शहर विद्रुप करणाऱ्या जाहिरातबाजांना धडा शिकविण्यासाठी नुकताच पनवेल महापालिकेने तीन जणांवर फौजदारी गुन्हे दाखल केला आहे. पनवेल शहर आणि नवीन पनवेल भागात एका कंपनीने, तसेच दोन वेगवेगळ्या अकॅडमी सेंटर यांनी जाहिरात केली होती. या संस्थांनी जाहिरात करताना महापालिकेची परवानगी घेतली नाही त्यांच्यावरती पनवेल शहर पोलिस ठाण्यात 'ड' प्रभागाचे प्रभाग अधिकारी अमर पाटील यांनी ही कारवाई केली आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पनवेल शहर, नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर या भागात कोणत्याही संस्थेला अगर इतर कोणत्याही आस्थापनेला जाहीरात करायची असेल तर महापालिकेच्या मुख्यालयाशी अगर प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असते. अशा प्रकारे पूर्वपरवानगी न घेता भित्तीपत्रके, जाहीरात केल्यास 'मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५' प्रमाणे महापालिकेला अशा संस्थेवरती अगर आस्थापनेवरती कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांनी सूचित केले आहे.





**पनवेल : गव्हाण (कोपर) ते आळंदी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पायी दिंडीला सुरुवात झाली आहे. या वेळी दिंडीच्या अध्यक्ष हभप इंदूताई म्हात्रे, उपाध्यक्ष हभप मनोहर पाटील, दिंडी चालक हभप प्रभाकर महाराज, हभप संत बानूबाई, मधूकर महाराज, अनंत महाराज, मनोज महाराज, हभप अनुसया घरत, विष्णूदादा महाराज, श्याम महाराज गायकवाड, काशिनाथ घरत तसेच गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत व ग्रामस्थ सहभागी झाले होते.**

## जासई हायस्कूलमध्ये एसएससी परीक्षा अर्ज भरण्याचा कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, तालुका उरण या विद्यालयातील इयत्ता दहावीत शिकत असलेले आणि मार्च २०२३ मध्ये प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे एसएससी बोर्डाचे फॉर्म भरण्याचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व भारतीय मजदुर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेछा देऊन आजच्या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर अभ्यासाशिवाय पर्याय नाही. कष्ट मेहनत करून आई वडिलांचे आणि शाळेचे नाव उंच करा असे मार्गदर्शन केले. अरुण जगे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर व विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग  यांनी प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका पाटील एस एस तसेच रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

दहावीच्या वर्गशिक्षिका एस. एस. मोकल, एस. एम. बाबर, एन. एन. हूद्दार, एस. ए. ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे फॉर्म भरण्या संदर्भात मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास कमिटी सदस्य मधुकर पाटील, यशवंत घरत, धर्मदास घरत, जेएनपीटीच्या कामगार नेत्या मनीषा म्हात्रे हे उपस्थित होते. उपस्थितांचे आभार एस. ए. ठाकूर यांनी मानले.



## उरण बोरी ते श्री क्षेत्र शिर्डी पालखी पदयात्रेला प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

श्रद्धा सबुरी पदयात्रा मंडळ उरण बोरी यांच्या वतीने श्री साई मंदिर उरण बोरी ते श्री क्षेत्र शिर्डी पालखी पदयात्रा सोहळ्याला बुधवारी (दि. ९) उरणमधून प्रारंभ झाला.

पदयात्रेचा नऊ दिवसांचा कालावधी असून ९ ते १७ नोव्हेंबर २०२२ असा आहे. मयुरेश पनिकर, हरिराम शर्मा, सुयोग ठाकूर, रोहन पारधी, राजेश पुरव, सिध्दार्थ म्हात्रे, सिध्दार्थ सुर्वे, जयेश



म्हात्रे, हंसराज चव्हाण, प्रशांत शिर्धनकर, प्रलय तारेकर, ओमकार राऊत, मयुरेश पाटील, विशाल जाधव, भुषण पाटील, योगेश म्हात्रे, चेतन माळी, गणेश तांडेल, रोहन गायकवाड, धनंजय भोरे, दीपक थळी, सुरेश अय्यर, आकाश जाधव आदी पदयात्री या पालखी पदयात्रा सोहळ्यात सहभागी झाले आहेत.

ॐ श्री साईनाथाय नमः या मंत्राचा जप करत सर्व भाविक भक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे पोहचतात व श्री साईबाबांचे दर्शन घेऊन मोठ्या आनंदाने घरी परततात. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मोठ्या भक्ती भावाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# हवा आधाराचा हात

हातीपायी धड असलेल्या सशक्त व्यक्तींपेक्षा दिव्यांगांची क्षमता अजिबात कमी पडत नाही याची अनेक उदाहरणे आसपास दिसतात. त्यांना हवा असतो तो फक्त थोडेसे पाठबळ देणारा हात. दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी गरज असते ती फक्त माणुसकीची. सहानुभूती किंवा अनुकंपा या गोष्टींसाठी कर्तृत्ववान दिव्यांग व्यक्ती कधीही अडून राहात नाहीत. दिव्यांग व्यक्तींना पाठबळ देण्यासाठी स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे. हा खरोखरच अत्यंत अभिनंदनीय निर्णय आहे.

**उरण :** द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या मैदानाची ओढ या विषयावर चर्चा (संभाषणे) या कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार मिलिंद खारपाटील यांना चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरण, रायगड तर्फे उरण विशेष सम्मान २०२२ हा पुरस्कार द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाला द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव दिलीप तांडेल, चाईल्ड केअर सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, कार्याध्यक्ष मनोज ठाकूर, आदर्श शिक्षक संजय होळकर, सामाजिक कार्यकर्ते रमाकांत म्हात्रे, सचिन पाटील, माणिराम म्हात्रे आदी समर्थक उपस्थित होते.

### कृपा परदेशी हिची निवड

**उरण :** शहरातील बोरीनाका येथे राहणाऱ्या कृपा कृपेश परदेशी हिची मोधेरा डान्स फेस्टीवलसाठी निवड झाली




आहे. कृपाला सन २०१५ व २०१७ मध्ये नवी दिल्ली राजपथावर झालेल्या पथसंचालनयामध्ये स्वर्गीय नितीन पाटील यांच्या साथीने २०१५ मध्ये प्रथम व २०१७ मध्ये तृतीय पुरस्कार महाराष्ट्राला मिळवून दिला. तसेच २४ ते २६ जानेवारी २०१२ मध्ये लखनौ येथे नृत्याचा कार्यक्रम केला. त्यावेळी लखनौच्या राज्यपाल श्रीमती आनंदीबेन पटेल यांना कृपा कृपेश परदेशी यांचा नृत्याविष्कार खूप आवडला व त्यांनी त्यांचा नृत्याविष्कार २६ जानेवारी रोजी लखनौ परेडमध्ये सादर करावयास सांगितले. कृपा कृपेश परदेशी हिची निवड आता गुजरातमध्ये होणाऱ्या प्रसिद्ध मोधेरा डान्स फेस्टिवलसाठी निवड झाली आहे.

# उरणमधील तुणीर डोंगराला आग

**उरण : रामप्रहर वृत्त**

नौदलाच्या तुणीर विभागाच्या डोंगराला बुधवारी (दि. ९) सायंकाळी ६ वाजता वणवा लागल्याने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. बुधवारी सायंकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास उरण शहरालगत असलेल्या तुणीर परिसरालगत असलेल्या डोंगरामध्ये वणवा लागल्याचे दिसून आले. डोंगराच्या पूर्व बाजूला असलेल्या भवरा झोपडपट्टीच्या दिशेने सुमारे ७०० ते ८०० मीटर लांबीच्या पट्ट्यात ही आग लागली होती.



या घटनेची माहिती मिळताच नौदलाच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. या वेळी, सिडको आणि नौदलाच्या सुमारे पाच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. तर, डोंगराला लागलेल्या वणव्याच्या ठिकाणी अग्निशमन दलाच्या गाड्या पोहचू शकत नसल्याने अग्निशमन दलाच्या जवानांनी डोंगरावर जाऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, सुमारे तीन तासांपेक्षा अधिक काळ ही आग विझविण्याचा प्रयत्न सुरू होता. तर, या वेळी सुरक्षिततेचा उपाय म्हणून अग्निशमन दलाच्या काही गाड्या या नौदलाच्या आतल्या बाजूला ठेवण्यात, तर एक गाडी ही बाहेरच्या रस्त्याच्या बाजूला ठेऊन आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# उरण ते शिर्डी पालखी दिंडी सोहळा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील श्री साईबाबांची मानाची पहिली पालखी श्री साई सेवा मंडळ उरण विभाग तर्फे काढण्यात आली. सालाबादप्रमाणे या वर्षीही श्री साई सेवा मंडळ उरण विभाग यांच्यावतीने श्री दत्तजयंती उत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा काढण्यात येणार आहे.

उरण देऊळवाडी येथील श्री दत्तमंदीरातून सोमवारी (दि. २८)सकाळी ६.३० वाजता श्रींची आरती करून श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रस्थान होणार असून मंगळवारी (दि. ६ डिसेंबर) सकाळी १० वाजता श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहचेल. सोमवारी सकाळी ६ ते ६.३० वाजता श्रींची पालखी व पादुका साईभक्त भाविकांच्या दर्शनासाठी देऊळवाडीतील श्री दत्तमंदिरामध्ये ठेवण्यात येणार आहेत. या पालखीचा व पादुकांच्या दर्शनाचा आवश्य लाभ घ्यावा. तसेच बाबांच्या पालखी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी न होणाऱ्या साईभक्त भाविकांनी पालखी दिंडीसोबत पाच पाऊले चालण्यासाठी व पायी चालत जात असलेल्या पदयात्री साईभक्तांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहून श्री साईंचा कृपा आशिर्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पहाटे ५ वाजता आरती, पूजन व भजन, ५.१५ वाजता ॐ श्री साईनाथाय नमः या मंत्राचा जप व पुढे मार्गस्थ प्रस्थान, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती, १२.३० वाजता श्री साई सच्चरित्राचे सामुदायिक साप्ताहिक पारायण तसेच साईस्तवन मंजुरी वाचन, ३.३० वाजता पुढील मुक्कामाकडे प्रस्थान, ॐ श्री साईनाथाय नमः मंत्रांचा जप, सायंकाळी ६.१५ वाजता धुपआरती असे कार्यक्रम असून सांगता श्री साई भंडारा व श्री सत्यनारायणाची महापूजा शनिवारी (दि. १७ डिसेंबर) उरण जसखार येथील श्री रत्नेश्वरी मंदिरात होणार आहे.

दिंडी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी अध्यक्ष संदीप पाटील (९९२०५४८१८१), उपाध्यक्ष अजित पाटील (९३२२८८८५०५), कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील (८८७९६१४९२०), उपाध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे (७०३९१०४२३७), सेक्रेटरी सुनिल पाटील (९६६४१६५८७७) यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिरनेर गावात नवमतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रम



**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या निवडणूक विभागामार्फत मतदार जनजागृतीचा संदेश प्रत्येक भागात पोहचावा यासाठी, राज्यातील प्रत्येक गावात १० नोव्हेंबर रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले असताना, उरण तालुक्यातील चिरनेर गावातील चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात मतदान यादी वाचण्याबरोबर या कार्यक्रमाच्या माध्यमातून, नव मतदारांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन करीत, छायाचित्रांसह मतदारांसाठी विशेष संक्षिप्त पूनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला होता.

यात ८ डिसेंबरपर्यंत नव मतदारांना आपल्या नावाची नोंदणी करता येईल, असेही या वेळी नमूद करण्यात आले. या वेळी मतदार जनजागृतीचा शुभारंभ करण्यात आला. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चिरनेर सजाचे तलाठी के. डी. मोहिते यांनी भूषविले होते. या वेळी तलाठी के. डी. मोहिते यांनी नव मतदारांना मार्गदर्शन करताना, लोकशाही सशक्त करण्यासाठी, मतदान आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाची मतदान म्हणून नोंदणी झालीच पाहिजे, यात सतरा वर्षांचा युवकही नोंदणी करू शकणार आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण होताच, त्याचा समावेश मतदार यादीत केला जाईल, असे सांगून पात्र युवकांनी मतदार म्हणून नोंदणी करून मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन तलाठी मोहिते यांनी या वेळी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण कुंभार, किशोर भगत, तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, सचिन घबाडी, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, संगणकीय क्लर्क प्रणिता राऊत, कोतवाल नथुराम कातकरी संताजी ठाकूर, सुनील ठाकूर तसेच अंगणवाडी सेविका दमयंती ठाकूर, वर्षा ठाकूर, वैजयंती म्हात्रे, अपर्णा पाटील, पुष्पा मोकल, रंजना मोकल आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त उरण माणकेश्वर येथे यात्रा

**उरण : वार्ताहर**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त जिल्ह्यातील अनेक शिवमंदिरांवर असंख्य दीप लावून मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा करण्यात आला. उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील माणकेश्वर मंदिरांवर दीपोत्सव करण्यात आले.

श्री माणकेश्वर देव ट्रस्ट यांच्या वतीने भक्तांना दर्शन घेण्यासाठी चांगली सोय करण्यात आली होती सुमारे १० हजार भक्तांनी दर्शन घेतले. गेल्या चार पिढ्या दिगंबर म्हात्रे यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांनी मंदिरा सामोरी दोन दीपस्तंभ सायंकाळी ६ वाजता प्रज्वलित करण्यात आले. परंपरेनुसार त्रिपुरारी पूर्णिमेच्या दिवशी दीपस्तंभ प्रज्वलित करण्यात येते. दीपस्तंभ प्रज्वलित करण्या समयी पूर्णिमा चालू असली पाहिजे असे शास्त्र आहे.



त्रिपुरारी पौर्णिमेला दिव्यांची आरास करून देव दिवाळी साजरी केली जाते. सात्विक मनं एकत्र करून दैवी शक्ती निर्माण करून दानवांचा नाश करा, सदाचार, सदविचार अंगिकारा असा संदेश देण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमा साजरी केली जाते.

श्री माणकेश्वर देव ट्रस्टचे अध्यक्ष शैलेश म्हात्रे, सचिव दिगंबर म्हात्रे, पुजारी दत्तात्रेय पाटील, प्रदीप पाटील, हर्ष पाटील, सचिन मोकल, समीर काठे, जितेंद्र म्हात्रे, संजय म्हात्रे, दीपक राउत, प्रीतम शरमकर, मनोहर पाटील, संतोष पेढवी, कविता म्हात्रे, पांडुरंग पाटील आदी उपस्थित होते. यात्रेत मिठाई, खेळणी, हार नारळ, सुंदर शोभेच्या वस्तू, खाद्य पदार्थ आदींची दुकाने थाटण्यात आली होती.

# पुण्यतिथीनिमित्त अन्नदान व भजन

**उरण : बातमीदार**

उरण नगर परिषदेचे कर्मचारी स्वर्गीय यादव हिराप्पा ममताबादे यांची प्रथम पुण्यतिथी मंगळवारी (दि. ८) देऊळवाडी झाली. दुपारी उरण चारफाटा येथे झोपडपट्टीतील गरीब मुलांना अन्नदान करण्यात आले, तर रात्री हरी भक्त पारायण वसंत बुवा मांडेलकर यांचे भजन झाले.

निर्मला हिराप्पा ममताबादे, प्रियांका यादव ममताबादे, सपना मुकेश केदारी, जागृती बालाजी हेड्डे, साईनाथ यादव ममताबादे, श्रद्धा यादव ममताबादे, पत्रकार विठ्ठल नागनाथराव ममताबादे, माधव नागनाथराव ममताबादे, माधव सिद्धेश्वरे, विशाल मरकेले, समस्त ममताबादे परिवार, सिद्धेश्वरे परिवार, मरकेले परिवार, धनुरे परिवार , हेड्डे परिवार, देशमुख परिवार, उरण नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी वर्गांनी आणि आपतेष्ट मित्र मंडळींनी स्व. यादव हिराप्पा ममताबादे यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली.



# प्रशांत दामलेंचे १२५०० नाट्यप्रयोग

## नवी मुंबईकरांतर्फे विशेष सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी नाटकांवर भरभरून प्रेम करणारी रसिक माणसे ही ऊर्जा असून ३२ वर्षांत १२५०० प्रयोग करू शकलो ते उत्तम दिग्दर्शक, सहकलाकार लाभले म्हणूनच, असे अभिनेते प्रशांत दामले यांनी नवी मुंबई येथील विष्णुदास भावे नाट्यगृहातील विशेष सत्कारावेळी सांगितले.

महाराष्ट्रात ५२ ठिकाणी नाट्यप्रयोग होऊ शकतात, त्यामध्ये नवी मुंबई महापालिकेचे विष्णुदास भावे नाट्यगृह स्वच्छता आणि सुविधांच्या दृष्टीने टॉप फाईव्हमध्ये असून त्यासाठी महापालिका आयुक्त आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नियमित जागरूकतेबद्दल प्रशांत दामले यांनी गौरवोद्गार काढले. नवी मुंबईतील भावे नाट्यगृह उत्तम आहेच त्या सोबतच नाटक कसे बघायचे हे उत्तमरित्या कळणारे नाट्यरसिक इथे आहेत असा विशेष उल्लेख त्यांनी केला.



आपल्या ३९ वर्षांच्या रंगभूमीवरील अभिनय कारकिर्दीत १२५०० प्रयोगांचा टप्पा पार करण्याचा अनोखा विक्रम करणारे सुप्रसिध्द अभिनेते प्रशांत दामले यांचा विष्णुदास भावे नाट्यगृह येथे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने प्रशासन विभागाचे उप आयुक्त नितीन नार्वेकर आणि क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम विभागाचे उप आयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या हस्ते शाल, पुणेरी पगडी व सन्मानचिन्ह प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला. 'एका लग्नाची पुढची गोष्ट' हा हाऊसफुल्ल नाट्यप्रयोगाप्रसंगी झालेल्या या गौरवाप्रसंगी नाटकातील सहकलावंत कविता मेढेकर, अतुल तोडणकर, पूर्वा भिडे, अतुल तोडणकर, राजसी चिटणीस, राजसिंह देशमुख, पराग डांगे यांनाही सन्मानीत करण्यात आले.

१९८३ साली 'टुरटूर' या नाटकापासून आपल्या व्यावसायिक अभिनय कारकिर्दीला सुरुवात केलेल्या प्रशांत दामले यांनी आपल्या ३९ वर्षांच्या नाट्यकारकिर्दीत १२५०० हून अधिक नाट्यप्रयोग केले. या विक्रमानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांच्या कारकिर्दीचा मुंबईतील षण्मुखानंद सभागृह येथे १२५००व्या प्रयोगाप्रसंगी रंगभूमीदिनाचे औचित्य साधून विशेष गौरव करण्यात आला.

दरम्यान, नाट्यगृहात प्रशांत दामले यांचे समस्त नवी मुंबईकर नागरिकांच्या वतीने अभिनंदन करीत त्यांच्या आगामी कारकिर्दीला शुभेच्छा दिल्या.

# कर्जत : सात ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर

## १८ डिसेंबरला मतदान तर २० रोजी मतमोजणी

**कर्जत : प्रतिनिधी**

ऑक्टोबर २०२२मध्ये मुदत संपलेल्या कर्जत तालुक्यातील सात ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. तेथे १८ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार असून मतमोजणी २० डिसेंबरला होणार आहे. या सात ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजल्याने राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत.

कर्जत तालुक्यातील दहिवली तर्फे वरेडी, उकरूळ, कळंब, वेणगाव, वावळोली, कोंदिवडे आणि मांडवणे या सात ग्रुपग्रामपंचायतींच्या लोकनियुक्त सदस्य मंडळाची मुदत २८ ऑक्टोबर २०२२ अखेर संपली आहे. या सातपैकी काही ग्रामपंचायती राजकीयदृष्टच्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १८ नोव्हेंबर रोजी तहसीलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.




नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार असून मतमोजणी २० डिसेंबर २०२२ रोजी होईल.

कर्जत तालुक्यातील कर्जत तालुक्यातील दहिवलीतर्फे वरेडी, उकरूळ, कळंब, वेणगाव, वावळोली, कोंदिवडे आणि मांडवणे या सात ग्रुपग्रामपंचायतींची मुदत संपली आहे. या सर्व ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक घेण्यासाठी मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

मागील सार्वत्रिक निवडणुकीत या सर्व सात ग्रामपंचायतींचे सरपंच थेट जनतेतून निवडून आले होते, ते वेगेवेगळ्या पक्षाचे होते. उकरूळ आणि दहिवलीतर्फे वरेडी ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरपंच निवडून आले होते, तर वावळोलीमध्ये शिवसेनेचा थेट सरपंच म्हणून निवडून आला होता, त्या आज शिंदे गटात आहेत. कळंबमध्ये शेकापच्या थेट सरपंच निवडून आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आणि आज त्या शिंदे गटात आहेत. वेणगावमध्ये शिवसेनेचा थेट सरपंच निवडून आला होता आणि आज ते शिंदे गटात आहेत. कोंदिवडे ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादीच्या थेट सरपंच निवडून आल्या होत्या आणि कोरोना काळात त्यांचे निधन झाले होते.

कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे राहात असलेल्या वावळोली ग्रामपंचायतीमध्येही सार्वत्रिक निवडणूक होणार असून, तेथे त्यांचा प्रमुख विरोधक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाची साथ मिळणार आहे. त्यामुळे वावळोली ग्रामपंचायत निवडणूक जिंकणे हे आमदार थोरवे यांच्यासाठी महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे झाले आहे.

# अलिबाग-मुरूड रस्त्याचे लवकरच मजबुतीकरण

**मुरूड : प्रतिनिधी**

स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नामुळे अलिबाग-मुरूड रस्त्याच्या रुंदीकरण व मजबूतीकरणासाठी नाबार्डतर्फे निधी उपलब्ध झाला असून, हे काम मे महिन्याअखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी मुरूडमधील पत्रकारांना दिली.

**शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख राजा केणी यांची माहिती**

राजा केणी एका कार्यक्रमानिमित्ताने मुरूड येथे आले असता, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. अलिबाग-मुरूड रस्त्याच्या रुंदीकरण व मजबूतीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. शिंदे गटाच्या महिला संघटिका शुभांगी करडे, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, अमोल लाड या वेळी उपस्थित होते. अलिबाग व मुरूड तालुक्यात जनता दरबार आयोजित करून आमदार महेंद्र दळवी लोकांचे प्रश्न ऐकून घेणार आहेत.

या जनता दरबारात सर्व शासकीय कार्यलयांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहतील, अशी तरतूद करण्यात आल्याची माहिती केणी यांनी दिली.

जलजीवन मिशन योजना व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यामार्फत मुरूड व अलिबाग तालुक्यात काही पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्या लवकरात लवकर कार्यान्वित व्हाव्यात, यासाठी आमदार दळवी यांचे प्रयत्न सुरू आहेत, असे केणी यांनी सांगितले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकांत समविचारी पक्षाशी युती केली जाणार आहे. जास्तीत जास्त नगरसेवक व जिल्हा परिषद सदस्य निवडून आण्याचा आमचा निर्धार असल्याचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी या वेळी स्पष्ट केले.

# पेणमधील विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रन फ्युचर इंडिया (सीएफआय) व इन्फोबीप कंपनीच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी पेणमधील सीएफआय ११वी सायन्समधील विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना मिळणारी ही आर्थिक मदत त्यांचा भावीकाळ घडविण्यासाठी खूप उपयोगी ठरणारी आहे. या मदतीमुळे ही मुले अभ्यासासाठी प्रेरित होतील व भविष्यात यांच्यामधून काही मुले बारावीत चांगले यश संपादन करतील, असा विश्वास चिल्ड्रन फ्युचर इंडिया संस्थेचे संचालक व मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केला. कुणाल माने यांनी इन्फोबीप कंपनीच्या कार्याचा आढावा घेतला. कंपनीने केलेल्या आर्थिक मदतीचा विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे उपयोग करुन यशस्वी व्हावे, असे आवाहन असिरुद्दीन शैख यांनी केले. इन्फोबीप कंपनीच्या पूजा जाधव तसेच भक्ती ढवळे व आर्यन कोळी या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. श्रेया कौल, श्रीधर श्रीनिवासन यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

# कृषी कर्ज नाकारल्याने बँक व्यवस्थापकाविरोधात तक्रार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कृषी कर्ज मिळणार नाही, असे सांगून अपमानस्पद वागणूक दिल्याबद्दल बँक ऑफ इंडियाच्या बोर्ली शाखेच्या व्यवस्थापकाविरोधात बारशीव येथील शेतकरी संजय महाडिक यांनी जिल्हाधिकारी, कृषीमंत्री व मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, कृषी कर्जाची आवश्यकता असल्याने नियमाप्रमाणे केसीसी/कृषी कर्ज घेण्यास पात्र असल्यामुळे बँक ऑफ इंडियाच्या बोर्ली शाखेत कर्ज मागणी केली होती. शाखेच्या व्यवस्थापक मयुरी घाग यांनी, हे कर्ज मिळणार नाही, असे सांगून व आर्वाच्च भाषेत बोलून आपल्याला अपमानस्पद वागणूक दिली.

यापूर्वी आपण बँकेकडून केसीसी/कृषी कर्ज रक्कम एक लाख ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते, त्याची १५ ऑक्टोबर २०२२ रोजी परतफेड केली आहे. आर्थिक अडचणीस्तव पुन्हा केसीसी/कृषी कर्जाची आवश्यकता असल्याने बँक ऑफ इंडियाच्या बोर्ली शाखेत गेलो असताना, या शाखेच्या व्यवस्थापिका मयुरी घाग यांनी हे कर्ज मिळणार नाही, असे सांगून अपमानस्पद वागणूक दिली.

बँक व्यवस्थाकावर कायदेशीर कारवाई करून निलंबीत करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

> **बारशीव येथील शेतकरी संजय महाडिक यांना कृषी कर्ज नाकारण्यात आले असून, त्याबाबत महाडिक यांचा गैरसमज झाला आहे.**
> **-मयुरी घाग, शाखा व्यवस्थापिका, बँक ऑफ इंडिया-बोर्ली शाखा**

# आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी पुढाकार घ्या

## जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

मतदारयादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम सुरु झाला असून या मतदार नोंदणी मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींसह दिव्यांग, तृतीयपंथी, बेघरांनी आपले नाव मतदारयादीमध्ये समाविष्ट होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी केले आहे.



दिव्यांग, तृतीयपंथीकरिता वय, पत्ता याबद्दल येत असलेल्या अडचणी लक्षात घेता आवश्यक दस्तऐवजाबाबत निवडणूक आयोगाद्वारे विशेष सवलत देण्यात आली आहे. नाव नोंदणीची सुविधा ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही माध्यमातून उपलब्ध आहे.

या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात १९ व २० नोव्हेंबर तसेच ३ व ४ डिसेंबर २०२२ रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संक्षिप्त पुनरीक्षण काळात विद्यार्थी, दिव्यांग महिला, देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिला, घर नसलेल्या भटक्या व विमुक्त जमातीच्या व्यक्ती, तृतीयपंथी या घटकांसाठीची १२ व १३ नोव्हेंबर तसेच २६ व २७ नोव्हेंबर २०२२ रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमांत १८ ते १९ वयोगटातील मतदार, तृतीयपंथी, देहविक्री व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आणि दिव्यांग मतदारांनी सहभागी होऊन आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करून घ्यावे. याकरिता मतदारांनी आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे जाऊन मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना ६ चे अर्ज भरुन द्यावे किंवा एनएसव्हीपी, व्हीएचए व व्हीपोर्टल या पोर्टलवर लॉग-इन करुन आपले नाव समाविष्ट करण्याबाबत ऑनलाइन अर्ज सादर करावा.

### दिव्यांगांसाठी विशेष पीडब्ल्यूडी ॲप

निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदारांसाठी विशेष पीडब्ल्यूडी या ॲपची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वापरण्यास सहज-सुलभ असलेल्या या ॲपच्या सहाय्याने दिव्यांग मतदारांना नाव नोंदणी करता येईल. ज्यांची नावनोंदणी आधीच झाली आहे, पण दिव्यांग म्हणून नोंद नसेल त्यांना या ॲपवरूनच दिव्यांगत्व चिन्हांकित करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. दिव्यांगत्व चिन्हांकित झाल्यानंतर या मतदारांना मतदानाच्या वेळी पोस्टल मतपत्रिका, चाकाची खुर्ची, वाहन, आदी सुविधा पुरविणे निवडणूक कार्यालयासाठी सोयीचे ठरते.

### तृतीयपंथींना दस्तऐवजात सवलत

मतदारयादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी वयाचा आणि निवासाचा दाखला आवश्यक असतो. मात्र, तृतीयपंथी, देहविक्री व्यवसायात असणाऱ्या महिलांना हे दस्तावेज सादर करणे कठीण जाते. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विशेष सुविधा उपलब्ध केली आहे. त्यांना मतदारयादीत नाव नोंदणी करताना वय आणि निवासाचा पुरावा देण्याची आवश्यकता नाही. तृतीयपंथी, देहविक्री व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यासारख्या वंचित घटकांनी ते जिथे राहतात तो पत्ता नमूद करून अर्ज दाखल करणे महत्त्वाचे आहे. नाव पत्त्यात बदल करण्यासाठी अर्ज क्रमांक ८ भरून त्यांचे आधीचे नाव, लिंग यामध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा आहे.

### सोशल मीडियाचा वापर

प्रत्येक पात्र व्यक्तीला मताधिकार बजाविता यावा यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे मतदार नोंदणी जनजागृतीसाठी आवाहन करणारी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम या समाजमाध्यमांद्वारे लघुचित्रफितींच्या माध्यमातून मतदार नोंदणीसाठी रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडूनही आवाहन करण्यात येत आहे.

मतदार यादीमधील नोंदणीमध्ये दुरुस्ती, नाव वगळणी, नविन नोंदणी तसेच मतदार यादतील नोंदणीस आधार क्रमांक जोडणी इत्यादी प्रक्रिया गावातील नागरिकांपर्यंत सुलभतेने पोहचाव्यात, याकरिता १० नोव्हेंबर २०२२ रोजी रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसेभेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप मतदारयादीचे वाचन या विशेष ग्रामसभेत होणार आहे.

त्यानुसार मतदारयादीत नाव समाविष्ट असलेल्या मतदारांच्या नावामध्ये दुरुस्ती, रहिवाशांचे स्थलांतरण, विधानसभा अंतर्गत/बाहेरील, मतदार ओळखपत्र बदलून देणे, दिव्यांग म्हणून चिन्हांकीत करावयाचे असल्यास नमुना ८ तसेच आपले मतदार ओळखपत्राशी आधारकार्ड जोडणी करण्याकरिता नमुना ६-ब भरुन संबंधीत मतदार आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी किंवा एनएसव्हीपी, व्हीएचए व व्हीपोर्टल या पोर्टलवर लॉग-इन करुन संबंधीत अर्ज ऑनलाइन पध्दतीने सादर करुन विशेष मोहीम/विशेष ग्रामसभेचा लाभ घ्यावा. तसेच ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी https://nvsp.in qH$dm https://voterportal.eci.gov.in या संकेतस्थळांना भेट द्यावी किंवा Voter Helpline हे ॲप वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी केले आहे.

# माणगावमधील शिबिरात ५० रुग्णांची नेत्रतपासणी


(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटल आणि उद्योजक विजय मेथा भातवाले यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ९) वृत्तपत्र विक्रेते पितांबर मेथा यांच्या माणगाव येथील हॉलमध्ये मोफत नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ५० रुग्णांची तपासणी केली. या वेळी १४ नेत्ररुग्णांना मोतीबिंदू आढळला. त्यांच्यावर नवीन पनवेलच्या शंकरा आय हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटल आणि उद्योजक विजय मेथा भातवाले यांच्या संयुक्त विद्यमाने दरमहिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन केले जाते.

गेल्या सात महिन्यांत दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील सुमारे ४५०हून अधिक रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. पुढील शिबिर बुधवारी (दि. १४) होणार असल्याची माहिती मेथा भातवाले यांनी दिली.

# अलिबाग वरसोली येथे विशेष ग्रामसभा

## जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे मार्गदर्शन





**अलिबाग : जिमाका**

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मतदारयादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२३ अंतर्गत गुरुवारी (दि. १०) अलिबाग तालुक्यातील वरसोली ग्रामपंचायत कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा घेण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी उपस्थित मतदारांना विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची माहिती दिली.

वरसोली ग्रामपंचातीमधील मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्ड जोडणी किती मतदारांची झाली याचा त्यांनी आढावा घेतला, तसेच वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांनी मतदार म्हणून नोंदणी करून मतदान प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होणे, तसेच मतदारयादीचे शुद्धीकरण करणे या दुहेरी उद्देशाने अधिकाधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास सूचित केले. या ग्रामसभेच्या निमित्ताने बुधवारी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदारयादीचे वाचनही करण्यात आले.

वरसोली ग्रामपंचातीच्या सरपंच प्रमिला भाटकर, उपसरपंच मिलिंद कवळे, सदस्य सुरेश घरत, सुजय घरत, नमिता माळवी, सजवणी कवळे, प्रियका गुंजाळ, नम्रता वर्तक, पूजा खोत, अनुराधा राणे, साधना राणे, दिलीप बना, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसीलदार मीनल दळवी, ग्रामविकास अधिकारी अनिल चवरकर, तलाठी दिलीप सानप यांच्यासह जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयातील कर्मचारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी या वेळी उपस्थित होते.

# भारतीय गोलंदाज सपशेल अपयशी

## जॉस बटलर आणि अलेक्स हेल्स यांची तुफान फटकेबाजी

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकात गुरुवारी (दि. १०) दुसरा उपांत्य सामना खेळला गेला. भारत आणि इंग्लंड यांच्या दरम्यान झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत सहा बाद १६८ धावा केल्या. विराट कोहली व हार्दिक पांड्या यांनी झळकावलेली अर्धशतके भारतीय फलंदाजीची वैशिष्ट्य ठरले, मात्र इंग्लंडच्या जॉस बटलर आणि अलेक्स हेल्स यांनी तुफान फटकेबाजी करीत १६९ धावांचे लक्ष्य सहज पूर्ण केले. भारतीय गोलंदाज सपशेल अपयशी ठरले. आता रविवारी (दि. १३) पाकिस्तान आणि इंग्लंडमध्ये अंतिम सामना होणार आहे.

प्रथम फलंदाजी संधी मिळालेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. राहुल केवळ पाच धावा काढून माघारी परतला. कर्णधार रोहित जम बसल्यानंतर २७ तर सूर्यकुमार यादव १४ धावा करून बाद झाले. एका बाजूने शानदार पद्धतीने खेळत असलेल्या विराट कोहलीने अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे स्पर्धेतील चौथे अर्धशतक ठरले, तसेच त्याने आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये ४००० धावांचा टप्पा पूर्ण केला. त्याने ५० धावांची खेळी केली. यामध्ये चार चौकार व एका षटकाराचा समावेश होता.

भारताचे फलंदाज एकामागून एक बाद होत होते, पण त्यावेळी संघाचा डाव सावरला तो कोहलीने कारण या वेळी फक्त संघाला डाव सावरला नाही, तर त्याने विश्वविक्रमही रचला.

हार्दिक पंड्याने या सामन्यात आपल्या लौकिकाला साजेशी फलंदाजी करीत इंग्लिश गोलंदाजांवर आक्रमण केले. त्याने अखेरच्या तीन षटकांमध्ये तुफान फटकेबाजी केली. यादरम्यान त्याने आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने अखेरच्या चेंडूवर हिट विकेट होण्याआधी ३३ चेंडूवर ६३ धावा केल्या. इंग्लंडसाठी क्रिस जॉर्डन याने सर्वाधिक तीन बळी मिळवले.



इंग्लंडची सलामी जोडी जॉस बटलर आणि ॲलेक्स हेल्स यांनी नाबाद शतकी सलामी देत भारतापासून सामना दूर नेण्यास सुरुवात केली. सावध सुरुवात करणाऱ्या ॲलेक्स हेल्सने २८ चेंडूत अर्धशतक ठोकत इंग्लंडला आठ षटकांत ८४ धावांपर्यंत पोहचवले.

अखेर इंग्लंडने नाबाद १६९ धावा करून भारताचा दारूण पराभव केला.

## रवींद्र जडेजाच्या पत्नीला भाजपकडून गुजरातमध्ये उमेदवारी

**गुजरात : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेट वर्ल्डकपमध्ये भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा दुखापतीमुळे खेळू शकला नाही, मात्र असे असले तरी आता रवींद्र जडेजा दुसऱ्या एका कारणामुळे चर्चेत आला आहे. रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा हिला भाजपने गुजरात विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिली आहे. त्यामुळे रिवाबा जडेजा या निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय विश्वात पदार्पण करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा हिला भाजप उमेदवारी देणार असल्याची चर्चा गेल्या दोन दिवसांपासून सुरू होती. अखेर ही चर्चा खरी ठरली असून गुरुवारी रिवाबाच्या तिकिटाची घोषणा भाजपकडून करण्यात आली आहे. आगामी निवडणुकीत जामनगर उत्तर या मतदारसंघातून रिवाबा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. त्यामुळे साहजिकच पत्नीसाठी खुद्द रवींद्र जडेजाही भाजपचा प्रचार करताना आगामी काळात दिसण्याची शक्यता आहे.

जामनगर उत्तर हा भाजपचा हक्काचा मतदारसंघ राहिला आहे. धर्मेंद्रसिंह जडेजा हे सध्या जामनगर उत्तर या मतदारसंघातून भाजपचे आमदार आहेत, मात्र भाजपने नवख्या रिवाबा जडेजा यांच्यावर विश्वास दाखवून त्यांना संधी दिली आहे.

## द्रोणागिरी विद्यालयात तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा



**उरण : वार्ताहर**

करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूल इंग्रजी माध्यम विद्यालयात तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा बुधवार (दि. ९) शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या वतीने उत्साहात झाल्या. कुस्ती स्पर्धांचे उद्घाटन करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन भालचंद्र शांताराम कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी स्कूल कमिटीच्या चेअरमन गीता भगत, कारंजा मच्छीमार सोसायटीचे सदस्य देवेंद्र कोळी, सदस्या हर्षदा कोळी व इतर मान्यवर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रभू यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

आपल्या भाषणात प्रभू मॅडम यांनी सर्व स्पर्धकांना कुस्ती खेळाविषयी मार्गदर्शन केले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी तालुका क्रीडा समन्वयक टेमकर यांनी विशेष मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धांमध्ये १४,१७, आणि १९ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्यानंतर सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका प्रभू आणि इतर सर्व शिक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक डी. सी. पाटील यांनी आभार मानले.

## कोहलीच्या डोळ्यांची पाकिस्तानी चाहत्यांना भीती

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेट वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानने न्यूझीलंडवर विजय मिळवून अंतिम फेरी गाठली आहे. हा सामना झाल्यानंतर काही पाकिस्तानी चाहत्यांच्या एक व्हिडीओ व्हायरल होत असून या व्हिडीओमध्ये दोन पाकिस्तानी महिलांनी आपल्याला विराट कोहलीची भीती वाटत असल्याचे बोलले आहे.

हा व्हिडीओ व्हायरल होत असून त्यावर नेटिझन्सच्या भन्नाट प्रतिक्रिया येत आहेत. काहींनी विराट कोहलीचे मैदानावरील व्हिडीओ ट्वीट केले आहेत, तर काहींनी मीम्सही शेअर केले आहेत.

## आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत लवलिना, अल्फियाचा अंतिम फेरीत प्रवेश



**अम्मान (जॉर्डन) : वृत्तसंस्था**

भारताची ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती लवलिना बोरगोहेन आणि आंतरराष्ट्रीय पदकविजेती अल्फिया पठाण या दोघींनी आशियाई अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली.

७५ किलो वजनी गटातून बुधवारी (दि. ९) झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत लवलिनाने कोरियाच्या सेऑन्ग सुयेऑनवर निर्विवाद वर्चस्व राखले. अचूक तंत्र आणि नेमके नियोजन याच्या जोरावर लविलानाने प्रतिस्पर्धीला संधीच दिली नाही. पंचांनीही लवलिनाच्या बाजूने ५-० असा कौल दिला. लवलिनाने यापूर्वी आशियाई स्पर्धेत कांस्यपदक मिळविले असून, आता अंतिम फेरी गाठल्यामुळे लवलिनाच्या पदकाचा रंग बदलणार आहे.

लवलिनापाठोपाठ अल्फियाने ८१ किलोपेक्षा अधिक वजनी गटात कझाकस्तानच्या लझ्झत कुंगेईबाएवाचे आव्हान असेच एकतर्फी परतवून लावले. पंचांनी अल्फियाच्या बाजूने ५-० असा निर्विवाद कौल दिला. अल्फिनाने सलग दुसऱ्यांदा लझ्झतवर मात केली. विजेतेपदाच्या लढतीत लवलिनाची गाठ आशियाई रौप्यपदक विजेती रुझमेटोवा सोखिभा, तर अल्फियाची गाठ इस्मा हुसायलीशी पडणार आहे. मीनाक्षी (५२ किलो), परवीन (६३ किलो) यांनीही विजय नोंदवले. या कामगिरीनंतर भारताची स्पर्धेतील चार रौप्यपदके निश्चित झाली आहेत.

## मुंबईत रंगणार जिओ मुंबई सायक्लोथॉन

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या वाढत्या प्रदूषणात सायकलचा वापर अधिक करणे गरजेचे आहे. त्यासाठीच महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनने मुंबई पोलीस, महानगरपालिका, एमएमआरडीए, एनसीबी, एमएसआरडीसी आणि महाराष्ट्र पर्यटन विभाग यांच्या भागीदारीने एक भव्य अशी सायक्लोथॉन जिओ मुंबई सायक्लोथॉनच्या रुपात १३ नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे.

वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स अर्थात बीकेसी ते वरळी या मार्गे ही सायक्लोथॉन पार पडणार असून राजीव गांधी सागरी सेतू अर्थात सी लिंक सायक्लोथॉन पार पडणार आहे. मुंबई शहरातील अशा प्रकारची ही पहिलीच सायक्लोथॉन असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. सहभाग घेण्यासाठी सध्या ऑनलाईन नोंदणी सुरू आहे. सायक्लोथॉनचे वेगवेगळ्या अंतरासाठी सहभाग घेता येऊ शकतो.

या वेळी सर्वात आधी म्हणजे पाच किमीची जॉय राईड असणार आहे. यामध्ये फक्त १० वर्षांखालील चिमुकल्यांसाठी आणि १० वर्षांवरील सर्वांसाठी अशा दोन स्पर्धा असतील. तर १० किमी, २५ किमी (फक्त महिलांसाठी), ५० किमी, ७५ किमी आणि १०० किमी अशा वेगवेगळ्या अंतराच्या सायक्लोथॉन पार पडतील.

## विराट कोहली ठरला पुन्हा सरस!

### आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये ४००० धावा पूर्ण

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

विराट कोहलीने पुन्हा इतिहास रचला आहे. कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये चार हजार धावा पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. टी-२० विश्वचषकात इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली.

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी विराट कोहलीला हा विक्रम करण्यासाठी फक्त ४२ धावांची गरज होती, पण त्याने इंग्लंडविरुद्ध ताबडतोड अंदाजमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आपल्या ४००० धावा पूर्ण केल्या आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अशी कामगिरी करणारा कोहली पहिला क्रिकेटपटू ठरला आहे.



या उपांत्यपूर्व फेरीपूर्वी कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकूण ११४ सामन्यांमध्ये ५२.७७च्या सरासरीने ३९५८ धावा केल्या होत्या. यादरम्यान कोहलीने एक शतक आणि ३६ अर्धशतके झळकावली, मात्र उपांत्य फेरीत ४२ धावा करताच कोहलीने ४००० धावा पूर्ण केल्या आहेत.

कोहली याआधी आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये तीन हजार धावा करणारा पहिला क्रिकेटर बनला होता. गेल्या वर्षी त्याने ही कामगिरी केली होती. कोहलीने ८७ सामन्यांच्या ८१ डावांमध्ये ५०.८६च्या सरासरीने तीन हजार धावा केल्या.

## जागतिक गोलंदाजांच्या क्रमवारीत श्रीलंकेचा हसरंगा पहिल्या स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) नुकत्याच जाहीर केलेल्या जागतिक टी-२० गोलंदाजांच्या क्रमवारीत श्रीलंकेचा वनिंदु हसरंगा पहिल्या स्थानावर पोहचला आहे. हसरंगाने अफगाणिस्तानचा फिरकीपटू रशीद खानची जागा घेतली आहे.

हसरंगाने सध्या चालू असलेल्या विश्वकरंडकामध्ये १५ गडी बाद केले. यात त्याने तीन वेळा एका सामन्यात तीन फलंदाजांना बाद करण्याची किमया साधली आहे. त्याने संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध आठ धावा देत तीन गडी बाद केले होते, तर नेदरलँडविरुद्ध २८ धावा देत तीन आणि अफगाणिस्तानविरुद्ध १३ धावा देत तीन गडी बाद केले होते.



भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव टी-२० क्रमवारीतील फलंदाजांच्या यादीत पहिल्या स्थानावर आहे, पण या यादीत सूर्याखेरीज भारताच्या एकाही फलंदाजाला अव्वल दहामध्ये स्थान मिळालेले नाही. अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत हार्दिक पंड्या तिसऱ्या स्थानावर असून या यादीतही पंड्याशिवाय भारताचा एकही खेळाडू नाही.

## आयपीएल २०२३च्या लिलावाची तयारी सुरू


### मार्चमध्ये सामने सुरू होण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक २०२२ सुरू असतानाच इंडियन प्रीमियर लीग २०२३साठीची खलबतेही तीव्र होत आहेत. स्पोर्ट्स स्टारच्या मते, आयपीएल २०२३चा लिलाव २३ डिसेंबर रोजी कोची येथे होणार आहे. त्याच वेळी, ही ग्रँड लीग मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होऊ शकते.

या आयपीएल लिलावासाठी सर्व फ्रँचायझींच्या मालकांनी रक्कम ही वाढवल्या जाऊ लागल्या आहेत. वास्तविक, सर्व संघांचे एकूण बजेट ९० कोटींवरून ९५ कोटींपर्यंत वाढू शकते. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात आयपीएलसाठी मेगा लिलाव झाला होता, त्यावेळी सर्व संघांनी एकूण २०४ खेळाडूंना खरेदी केले होते.

आयपीएल २०२२प्रमाणेच आयपीएल २०२३मध्ये एकूण १० संघ खेळतील. आता १५ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक संघाला ते त्यांच्या संघातून कोणते खेळाडू सोडत आहेत याची माहिती द्यावी लागेल.



जे खेळाडू सोडले जातील त्यांना लिलावात जाण्याची संधी मिळणार आहे.

सध्या कोणत्याही संघाने रिटेन्शन लिस्ट जाहीर केलेली नाही, ज्याच्या आधारे कोणते खेळाडू सोडले जातील याचा निर्णय घेतला जाईल म्हणजेच कोणाला लिलावात जावे लागेल. जर या अहवालांवर विश्वास ठेवला तर, या वेळी संघांकडून अनेक मोठी नावे जाहीर केली जाऊ शकतात.

ज्यामध्ये मुंबई इंडियन्सचा केरॉन पोलार्ड, गुजरात टायटन्सचा मॅथ्यू वेड, दिल्ली कॅपिटल्सचा शार्दुल ठाकूर, राजस्थान रॉयल्सचा नवदीप सैनी, पंजाब किंग्जचा मयांक अग्रवाल, शाहरुख खान आणि कोलकाता नाईट रायडर्सचा शिवम मावी, व्यंकटेश अय्यर या खेळाडूंचा समावेश आहे.

या वर्षीचा लिलाव हा मिनी असणार आहे कारण गेल्या वर्षी एक मेगा लिलाव झाला होता ज्यामध्ये अनेक बदल दिसून आले होते. आयपीएलची ही लिलावाची घोषणा खेळाडू आणि चाहत्यांना आणखी उत्साहित करेन यात काही शंका नाही. ही ग्रँड लीग मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होऊ शकते. त्यामुळे आता चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.



## हिटमॅनवर चाहत्यांना संताप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेमध्ये इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीतील सामन्यामध्ये रोहित शर्मा २८ चेंडूमध्ये २७ धावांची खेळी करून तंबूत परतला. त्यामुळे भारतीय क्रिकेट चाहते चांगलेच संतापले आहेत.

या संपूर्ण मालिकेमध्ये कर्णधार रोहित शर्माने अत्यंत खराब कामगिरी केल्याचे दिसून आले. नेदरलँड्सविरुद्धचे अर्धशतक वगळता रोहितला धावांसाठी झगडावे लागले. रोहितचा हाच सुमार फॉर्म इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात दिसून आला. त्यामुळे चाहते संतापले आहेत.

## आजपासून ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनची निवड चाचणी स्पर्धा

**ठाणे : प्रतिनिधी**



ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने सर्व गटाच्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला शुक्रवार (दि. ११)पासून सुरुवात होणार. ठाणे, भिवंडी, कल्याण, बदलापूर, टिटवाळा या पाच विभागात ही स्पर्धा खेळविण्यात येईल. यातील पात्र संघ मुख्य स्पर्धेत खेळातील.

११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत ठाणे विभागाची स्पर्धा ग्रीफिन जिमखाना व रा. फ. नाईक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रा. फ. नाईक विद्यालयाच्या पटांगणात, भिवंडी विभागाची स्पर्धा उजाळा क्रीडा मंडळाच्या सहयोगाने वळगाव येथे मंडळाच्या पटांगणावर, माऊली प्रतिष्ठान व अश्वमेघ स्पोर्ट्स-डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने उषा नगर सोसायटीच्या बाजूला रेल्वे वसाहतीजवळ ठाकुर्ली (पू.) येथे कल्याण विभागाकरिता, राज क्रीडा मंडळाच्या सहकार्याने कुळगाव-बदलापूर येथील गावदेवी तलावाजवळ बदलापूर विभागाकरिता, तर टिटवाळा विभागाकरिता संघर्ष क्रीडा मंडळाच्या विद्यमाने १२ ते १३ नोव्हेबर वक्रतुंड मैदान, वैकुंठेश्वर मंदिराच्या बाजूला, मोहणे, आंबिवली (पू.) येथे या स्पर्धा होतील. या पाच विभागातून पात्र ठरलेले संघ मुख्य स्पर्धेत सहभागी होतील.

कुमार/कुमारी गटात पात्र ठरलेले संघ १५ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत ओम वर्तकनगर स्पोर्ट्स क्लबच्या सहकार्याने आयोजित स्पर्धेत साखळी व बाद पद्धतीने खेळतील. किशोर/किशोरी गटाकरिता पात्र ठरलेले संघ १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत चिंतामणी स्पोर्ट्स क्लबच्या सहकार्याने होणाऱ्या स्पर्धेत एकमेकांना भिडतील, तर प्रिन्स इंटरप्राइजेस व जॉयकुमार युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत पुरुष अ-ब व महिला पात्र संघाची स्पर्धा रंगेल, असे एका पत्रकाद्वारे ठाणे जिल्हा कबड्डी असो. चे सचिव मालोजी भोसले यांनी सांगितले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com